u-ee

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सुचनापत्र**

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/एफआय/ १२०७ दि.२६.०३.२०१९

विषय: अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' (निधी संकेतांक:४०) चे सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजाची महापालिकेच्या स्तरावरील स्वीकृती.

संदर्भ : स्थायी समितीने दि.२२.०२.२०१९ रोजीच्या ठराव क्र.१८०७ अन्वये दिलेली मंजुरी.

.........

मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १२६ ई (सुधारित) अन्वये स्थायी समितीस सादर करण्यात आलेल्या सन २०१८-१९ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाना आणि सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजाना कोणतेही बदल न करता स्थायी समितीने त्यांच्या दि.२२.०२.२०१९ रोजीच्या ठराव क्र.१८०७ अन्वये मंजुरी दिलेली होती. त्यानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १२६ फ (३) अन्वये स्थायी समितीने मंजूर केलेले सन २०१८-१९ चे सुधारित तसेच सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' महापालिकेस दि.०१.०३.२०१९ रोजी स्वीकृतीकरीता सादर करण्यात आलेले होते.

२. वरील प्रमाणे स्थायी समितीने सादर केलेले सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१९-२० चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' **महापालिकेने त्यात कोणतेही बदल न करता** दि.०२.०३.२०१९ रोजी बोलाविलेल्या बैठकीमध्ये स्वीकृत केलेले आहेत.

३. स्थायी समितीस सादर करण्यात आलेले सन २०१८-१९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१९-२० वर्षाच्या अर्थसंकल्प 'ग' च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या संगणकीय प्रती सर्व खाते/विभागीय प्रमुखांना हया खात्यातर्फे यापूर्वीच वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

४. सर्व खाते/विभागीय प्रमुखांनी कृपया याची नोंद घ्यावी.

सही/- २६.०३.२०१९

**(रामदास क. आव्हाड)**

**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)**

---

**सुचनापत्र**

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/एफआय/ १२०७ दि.२६.०३.२०१९

प्रत ........................................(.... जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२६/०३/१९

(प्रमोद पांडुरंग चव्हाण)

**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.) यांजकरिता**

२६/०३/१९

Y:\A.O. Budget Word\Budget 2019-20\Circular 2019-20.doc